Literacy for a Billion

Movie: Agnipariksha
Year: 2010

Song: Ek Vaar Modu Aamhi
Lyricist:

एक वार मोडू आम्ही
पण झुकणार नाही
आले कुणी अंगावर तर
मग सोडणार नाही
एक वार मोडू आम्ही
पण झुकणार नाही
आले कुणी अंगावर तर
मग सोडणार नाही
पाठीशी तो आमच्या सह्याद्रीराजा
कृष्णा कोयना गोदा कोकणचा दर्या
लागू नका कुणी आमच्या नादा
पेटून उठेल आता चांदा बांदा
कधी गरम कधी ठंडा
हा मराठी बंदा
कधी गरम कधी ठंडा
हा मराठी बंदा
जीव घेतो जीव देतो दिसतो साधा
कधी गरम कधी ठंडा
हा मराठी बंदा
कधी गरम कधी ठंडा
हा मराठी बंदा

हो हो हो
हो हो हो
हो हो हो हो हो
हो हो हो
हो हो हो
हो हो हो हो हो
जिजाऊ ताराराणी शूर

हारला शत्रू तो बलवान
अहिल्या सावित्रीचे कार्य
वाढली महाराष्ट्राची शान
झुंजार लढा बाणेदार
अशी हिरकणी ती महान
ताटी उघडा ज्ञानोबा
म्हणे मुक्ताईचे ज्ञान
हरहर महादेव
शिवबा राजा हाती
भवानी मातेची तलवार
भूमी संतांची वीरांची
पुण्यवान ही फार
हरहर महादेवाचा वाजे डंका
गनिमी काव्याने जळे शत्रूची लंका
लागून नका कुणी आमच्या नादा
पेटून उठेल आता चांदा बांदा
कधी गरम कधी ठंडा
हा मराठी बंदा
कधी गरम कधी ठंडा
हा मराठी बंदा

चार कोसा वरती बदले
भाषा मराठी न्यारी
कोल्हापुरी फेटेवाला
पगडीवाला पुणेरी
बहीणाईची अहिराणी
कोकणची रसाळ वाणी
साधी भोळी अशी
वऱ्हाडी भाषा खानदानी

PlanetRead

Literacy for a Billion

विठ्ठल नामाच्या गजरात
चाले विठ्ठलाची दिंडी
बालगंधर्व रंगविती नाटकाची नांदी
चमचम त्या पोषाखात अवतारी दशावतार
टणटण वाजे नाल लया लावणीची धार
अटके पार फडके सदा हा भगवा झेंडा
कष्टाची खाऊ भाकरी पर सच्चा धंदा
लागू नका कुणी आमच्या नादा
पेटून उठेल आता चांदा बांदा
कधी गरम कधी ठंडा
हा मराठी बंदा

कधी गरम कधी ठंडा
हा मराठी बंदा
जीव घेतो जीव देतो दिसतो साधा
कधी गरम कधी ठंडा
हा मराठी बंदा
कधी गरम कधी ठंडा
हा मराठी बंदा
कधी गरम कधी ठंडा
हा मराठी बंदा
कधी गरम कधी ठंडा
हा मराठी बंदा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*